Subject Code **J-321**

Seat No. | | | | | | | |

M

DATE : 01/07/2026

Time : 11.00 - 2.00

SUBJECT : ECONOMICS (49)

DURATION : 3 Hours   TOTAL PAGES : 6   TOTAL MARKS : 80

सूचना : (i) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(ii) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.

(iii) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(iv) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.

प्र. १. (अ) खालील विधाने पूर्ण करा : (५) २०

(i) Ed = 0 हा अनुभव येणाऱ्या ....

(अ) चैनीच्या वस्तू   (ब) सर्वसाधारण वस्तू

(क) जीवनावश्यक वस्तू   (ड) टिकाऊ वस्तू

(ii) व्यापारतोलाला असेही म्हणतात ....

(अ) राष्ट्रीय व्यापारतोल

(ब) आंतरराष्ट्रीय व्यापारतोल

(क) व्यवहारतोल

(ड) सर्व आंतरराष्ट्रीय आर्थिक देण्याघेण्याचे व्यवस्थित विवरण

(iii) 'पैसा, व्याज व रोजगारविषयक सामान्य सिद्धान्त' (General Theory of Employment, Interest and Money) हे प्रसिद्ध पुस्तक यांनी प्रकाशित केले ....

(अ) प्रा. आल्फ्रेड मार्शल

(ब) डेव्हीड रिकार्डो

(क) लॉर्ड जे.एम. केन्स

(ड) ॲडम स्मिथ

(iv) जेव्हा सरकार देशातील नागरिक, बँका, मध्यवर्ती बँका, वित्तीय संस्था, औद्योगिक क्षेत्र, इत्यादीकंडून कर्ज घेतात तेव्हा त्यास ....

(अ) अंतर्गत कर्ज (ब) वैयक्तिक कर्ज

(क) बाह्य कर्ज (ड) आंतरराष्ट्रीय कर्ज

(v) असा कालावधी ज्यात उत्पादनाचे घटक आणि उत्पादन खर्च बदलणे शक्य असते त्याला .... असे म्हणतात.

(अ) अत्यल्पकाळ (ब) अल्पकाळ

(क) दीर्घकाळ (ड) अतिदीर्घकाळ

(ब) सहसंबंध पूर्ण करा : (५)

(i) [ ] : शिक्षक : : रूप उपयोगिता : मातीपासून खेळणी

(ii) पूर्ण स्पर्धा : असंख्य विक्रेते : : [ ] : काही विक्रेते

(iii) तात्त्विक अडचण : विनामूल्य सेवा : : [ ] : मालाच्या साठ्याचे मूल्य

(iv) पेन आणि शाई : [ ] : : चहा आणि कॉफी : पर्यायी वस्तू

(v) निर्यात कल : पेट्रोलियम उत्पादने : : [ ] : सोने

(क) अर्थशास्त्रीय पारिभाषिक शब्द लिहा : (५)

(i) देशातील आणि देशाबाहेरील एकत्रित समभाग आणि कर्ज अशा दोन्हीही दीर्घमुदतीच्या निधींची बाजारपेठ –

(ii) अशी वस्तू जी अनेक उपयोगासाठी मागणी केली जाते –

(iii) विशिष्ट कालावधीत विक्रेत्याकडे विक्रीसाठी उपलब्ध असलेली एकूण नगसंख्या –

(iv) काही विशिष्ट हेतुने तयार केला जाणारा निर्देशांक –

(v) सरकारचे अंदाजे महसुली उत्पन्न आणि सरकारचा महसुली खर्च या दोन्ही बाबी समान असणारे अंदाजपत्रक –

(ड) विसंगत शब्द ओळखा : (५)

(i) स्थूल अर्थशास्त्राची व्याप्ती :

उत्पन्न व रोजगार सिद्धान्त, वस्तूच्या किंमत निश्चितीचा सिद्धान्त, सर्वसाधारण किंमत पातळी सिद्धान्त, विभाजनाचा समग्रलक्षी सिद्धान्त.

(ii) राष्ट्रीय उत्पन्न मोजण्याच्या पद्धती :
उत्पादन पद्धती, उत्पन्न पद्धती, खर्च पद्धती, गुणोत्तर पद्धती.

(iii) मागणी वक्र डावीकडून उजवीकडे वरून खाली येण्याची कारणे :
पुरवठा नियम, उत्पन्न परिणाम, पर्यायता परिणाम, नवीन उपभोक्ते.

(iv) पुरवठा नियमाचे अपवाद :
कृषी उत्पादने, नाशवंत वस्तू, दुर्मीळ वस्तू, गिफेनचा विरोधाभास.

(v) उपयोगितेचे प्रकार :
रूप उपयोगिता, एकूण उपयोगिता, काल उपयोगिता, स्थल उपयोगिता.

प्र. २. (अ) खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६) **१२**

(i) अर्णव दररोज ₹ ५०० दरा प्रमाणे ८०डझन आंब्यांची विक्री करतो.

(ii) साखरेच्या किंमतीत १० टक्के वाढ झाली असता साखरेच्या मागणीत १० टक्के घट होते.

(iii) रीनाने ₹ ५०,०००ची एकरकमी रक्कम एक वर्षाकरिता बँकेत जमा केली.

(iv) शबानाने आपल्या कारखान्यातील कामगारांना वेतन आणि बँक कर्जावरील व्याज दिले.

(v) वृंदाला राज्य सरकारकडून दरमहा ₹ ५,००० निवृत्ती वेतन मिळते.

(ब) फरक स्पष्ट करा (कोणतेही तीन) : (६)

(i) प्रत्यक्ष मागणी आणि अप्रत्यक्ष मागणी

(ii) लासपेअर किंमत निर्देशांक आणि पाश्चेचा किंमत निर्देशांक

(iii) प्रत्यक्ष कर आणि अप्रत्यक्ष कर

(iv) सूक्ष्म अर्थशास्त्र आणि स्थूल अर्थशास्त्र

(v) एकूण खर्च आणि एकूण प्राप्ती

प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : **१२**

(i) उपयोगितेची कोणतेही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(ii) विदेशी व्यापाराची भूमिका कोणत्याही चार मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करा.

(iii) सूक्ष्म अर्थशास्त्राची कोणतेही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iv) मागणीची लवचीकता निर्धारित करणारे कोणतेही चार घटक स्पष्ट करा.

(v) मक्तेदारीचे कोणतेही चार प्रकार स्पष्ट करा.

प्र. ४. खालील विधानांशी आपण सहमत आहात किंवा नाहीत ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही तीन) : **१२**

(i) पुरवठ्याच्या नियमाला अनेक गृहीतके आहेत.

(ii) 'वस्तूभेद' मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे एकमेव वैशिष्ट्य आहे.

(iii) सीमान्त उपयोगिता आणि एकूण उपयोगिता समान आहे.

(iv) निर्देशांकाला अनेक मर्यादा आहेत.

(v) सार्वजनिक वित्त व खाजगी वित्त यामध्ये फरक आहे.

प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **८**

(i) तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)

वस्तू	२००० मधील वस्तूंची संख्या (मूळवर्ष) q_0	२००१ मधील वस्तूंची संख्या (चालू वर्ष) q_1
अ	२०	४५
ब	४०	७०
क	६०	१०५
ड	२०	६०
एकूण	$\Sigma q_0 =$ ☐	$\Sigma q_1 =$ ☐

प्रश्न :

(अ) वरील तक्ता पूर्ण करा. (१)

(ब) वरील तक्त्याच्या आधारे संख्यात्मक निर्देशांक काढा. (३)

(ii) खालील आकृतीचे निरीक्षण करा आणि प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)

आकृतीमध्ये 'म $म_४$' हा रेषीय मागणी वक्र आहे. आकृतीच्या आधारे खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा.



प्रश्न :

(१) $म_३$ या बिंदूवर मागणी अधिक लवचीक आहे. (१)

(२) $म_१$ या बिंदूवर मागणी एकक लवचीक आहे. (१)

(३) $म_२$ या बिंदूवर मागणी कमी लवचीक आहे. (१)

(४) म या बिंदूवर मागणी संपूर्ण लवचीक आहे. (१)

(iii) खालील उतारा अभ्यासून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा : (४)

वित्त मंत्रालयाने द्वि-स्तरीय वस्तू व सेवाकर (GST) प्रणालीचा प्रस्ताव ठेवला आहे. सध्याच्या अनेक गट (स्लॅब) ऐवजी कमी गट (स्लॅब्स) असतील ज्यामुळे कर रचना सुलभ होईल. या सुधारणांमुळे लघू, मध्यम व सूक्ष्म उद्योग यांना कर कमी भरण्याचा फायदा होईल तसेच ग्राहकांसाठीही वस्तू तुलनेने स्वस्त होतील. केंद्र सरकारला कर महसुलाशिवाय उपकर (सेस) आणि अधिभार (सरचार्ज) या मार्गानेही मोठा महसूल मिळतो.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी उपकर (सेस) आणि अधिभार (सरचार्ज) मधून सरकारला ₹ ५.९१ लाख कोटी मिळण्याचा अंदाज आहे. हे मागील वर्षाच्या तुलनेने ९.४३ टक्के वाढलेले आहे.

अलीकडे काही वस्तूंवरील वस्तू व सेवा कर (GST) दर कमी करण्यात आले आहेत. त्यामुळे ग्राहकांना फायदा होईल. खरेदी वाढेल आणि आर्थिक मागणीला चालना मिळेल मात्र या

दरकपातीमुळे सरकारला महसूलात घट होईल. अधिकाऱ्यांच्या मते ही तूट इतर आर्थिक उपाययोजनांद्वारे व कार्यक्षम कर संकलनाद्वारे भरून काढता येईल.

भारतात सार्वजनिक वित्त व्यवस्थेला आज मोठी आव्हाने आहेत–

महसूल घट व वाढते खर्च.

वित्तीय तूट कमी करणे आणि गुंतवणुकीला चालना देणे.

यामुळे सरकारला करसुधारणा खर्चाचे प्राधान्यक्रम निश्चित करणे आणि दीर्घकालीन पायाभूत सुविधा, गुंतवणूक यावर भर द्यावा लागत आहे.

प्रश्न :

(१) २०२५–२६ आर्थिक वर्षासाठी उपकर (सेस) आणि अधिभार (सरचार्ज) मधून सरकारला किती महसूल अपेक्षित आहे? (१)

(२) भारताच्या सार्वजनिक वित्त व्यवस्थेला आज कोणती मोठी आव्हाने आहेत? (१)

(३) वरील उताऱ्याविषयी स्वमत लिहा. (२)

प्र. ६. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **१६**

(i) मागणीचा नियम अपवादांसह स्पष्ट करा.

(ii) राष्ट्रीय उत्पन्नाची व्याख्या सांगून राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iii) भारतातील नाणे बाजाराची भूमिका स्पष्ट करा.

◆◆◆